Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 56 – 59
DOI: 10.5281/zenodo.10072404

**Original Research Article**

# महात्मा गांधी यांच्या सत्याग्रही विचारांची जडणघडण

प्रा. डॉ. ए. एस. करडे

विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी जि. धाराशिव ४१३५०३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: siddhiraj1217@gmail.com

Received: 07 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

## महात्मा गांधी यांचे विचार

१९०३ मध्ये महात्मा गांधींनी ट्रान्सवालचे रहिवाशी होण्याचे ठरविले. तेव्हापासून तर सर्वधर्म पंथाचे राजकीय ठराव महात्मा गांधी यांच्याकडेच असायचे. ट्रान्सवाल मधील ब्रिटीश राजवटीने एशियन लॉ अमेंडमेंट ऑर्डिनन्स २४ ऑगस्टला गॅझेटमध्येप्रकाशित करण्यात आला होता. १ ट्रान्सवालमधील सर्व आशियाई रहिवाशांना हळूहळू हाकलून देवून हा प्रांत सर्वस्वी गोऱ्यांचाच व्हावा, ही योजना होती. त्यासाठी पुन्हा आशियाई लोकांनी नोंदणी करावी. ती सुध्दा गुन्हेगारांकडून घेतले जातात. तसे दहाही बोटांचे ठसे देवून. असे या प्रस्तावित कायद्यात सांगितले आहे. हा कायदा संमत झाला असता तर आशियाई लोकांचा दर्जा काफीर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काळया जमातीपेक्षा हीन ठरला असता. या चौथ्या ठरावाचा उद्देश स्पष्ट होता. हा नवीन कायदा संमत न करण्याची या सभेने केलेली विनंती जर लेजिस्लेटीव्ह कौन्सिल आणि स्थानिक राज्यकर्ते यांनी मान्य केली नाही. लंडनच्या साम्राज्यवादी सरकारनेही या कायद्याला संमती दिली. तर मग ब्रिटीश परंपरेला न शोभणाऱ्या या कायद्याच्या तरतुदी किती अन्यायकारक आहेत, हक स्पष्ट दाखवून देतील. सिव्हील डिसोबेडियन्सचे हे महत्वाचे पाऊल होते. १९१४ साली स्मटस यांनी आणि १९४७ साली ॲटली यांनी घेतलेल्या निर्णयामागे गांधींच्या शांततामय चळवळीखेरीज, इतर अनेक कारणे होती. तरीही गांधींची अहिंसेवरील निष्ठा, त्यांचा विरोध यांच्यावरील विश्वास आणि त्यांच्यावर आपला निर्णय न लादता त्यांना आपल्या बरोबर न्याय निर्णयाकडे घेवून जाणे. ही या दोन्ही महान लढ्यांची वैशिष्ट्ये होती. तुमच्या शत्रुवर विजय मिळवायचा असेल तर तो प्रेमाने मिळवा हे त्यांचे मुख्य तत्व होते. ११ सप्टेंबर १९०६ ची संध्याकाळ होती. जोहान्सबर्गच्या एम्पायर थिएटर्स मध्ये बॅ. मोहनदास करमचंद गांधी मंचारव ऐकत बसले होते. थिएटर दुपारपासूनच हिंदी रहिवाश्यांनी भरले होते. चौथा ठराव

मांडण्याची वेळ येईपर्यंत बराच उशीर झाला होता. पुढे जेल ठराव म्हणून ओळखला गेलेला हा ठराव महात्मा गांधी यांनीच तयार केलेला होता.

हा ठराव संमत झाल्यानंतर महात्मा गांधी लंडनला गेले. त्यावेळी तेथे मताधिकारासाठी तेथील महिलांनी केलेली चळवळ त्यांनी पाहिली होती. हेन्री डेव्हिड थोरो या अमेरिकन विचारवंताचे विचार वाचून त्यांच्या निर्धाराला बळकटी प्राप्त झाली. इंग्लंडमधील चळवळीला सिव्हिल डिसोबेडियंन्टस म्हटले जात होते. परंतु सफ्रेजेस भगिनींना (मताधिकारांसाठी लढणाऱ्या स्त्रिया) हिंसेचे वावडे नव्हते. त्यामुळे वर्षभरानंतर गांधींनी आपल्या चळवळीला सत्याग्रह हे वेगळे नाव निवडले. नोव्हेंबर १९०७ मध्ये रामसुंदर पंडित या पुजाऱ्याने सर्वात आधी कायदा मोडून तुरुंगवास पत्कारला.२ महात्मा गांधींना कैद झाली. महात्मा गांधींनी पुन्हा कबुल करून आपल्याला जास्तीत जास्त सजा द्यावी. अशी विनंती केली. ते स्वत:वरील होते, त्यावेळी वरील कोर्टाचा ऑफिसर मानला जायचा.३ महात्मा गांधींना शिक्षा करणे ही न्यायाधिशाच्या दृष्टिने नामुष्की होती. हे सर्व घडेपर्यंत जेल ठरावाला १६ महिने उलटून गेले होते. तरीही ११ सप्टेंबर १९०६ हा सत्याग्रह जन्म दिन मानणे योग्य ठरेल. शंभर वर्षापुर्वी संमत झालेल्या या चौथ्या ठरावामुळे सत्याग्रह या संकल्पनेचा विचार करताना तुरूंगवास हे पारंपारिक शस्त्राला पर्यायी शस्त्र गांधीनी शोधून काढले. विशीष्ट प्रसंगी कोणताही कायदा वंशभेदावर आधारित नसावा. हे तत्व होते. १८५८ साली जाहिर केलेल्या जाहिरनाम्यातील सर्व ब्रिटीश कॉलनीच्या जडणघडणीत युरोपियनांप्रमाणे हिंदी प्रजेलाही संधी मिळणे आवश्यक होते. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी रहिवाशांनी आपली कर्तव्ये कसोशीने पाळली होती. ट्रान्सवालमधील लेजिस्लेटिव्ह कौन्सिल प्रस्तावित कायदा संमत करू नये आणि त्यांनी तसे केल्यास ब्रिटीश शासनाने प्रिटोरिया किंवा लंडन येथील राज्य त्यांनी या न्याय मागण्या मान्य केल्या नाहीत तर आत्मक्लेशावर आधारित शांततामय चळवळीने विरोध करावयाचा होता. सत्याग्रह हे एक प्रभावी अस्त्र आहे. प्रतिकाराची ती एक अत्यंत जबरदस्त पध्दती आहे. या विश्वासाने सत्याग्रह करायचा होता. पारंपारिक शस्त्रास्त्राचे उपलब्ध नाहीत म्हणून नव्हे. शांततामय प्रतिकार म्हणजे शांततामय जबरदस्ती नव्हे, तर प्रतिस्पर्ध्याला वळवून आपल्याला न्याय वाटणारा निर्णय घ्यायला लावणे हे होते. परंतु दुसऱ्या दिवशी ट्रान्सवाल असेंम्बलीमध्ये हा कायदा मान्य करण्यात आला. सर्वच प्रतिनिधींनी युरोपीयन आणि त्यांची एकच चळवळ सुरू होती. १२ सप्टेंबर पासून नोव्हेंबर १९०७ पासून ट्रान्सवालचे राज्यकर्ते आणि इंग्लंडमधील सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर कॉलनीज् यांना समजाविण्याचे अनेक प्रयत्न झाले. गांधी व हाजी वजीर अली प्रतिनिधी म्हणून लंडनला जावून आले. त्यांच्या प्रयत्नांला यश मिळण्याचा भास निर्माण कण्यात आला. पण ब्रिटीश शासनाने जरी हा कायदा नामंजूर केला तरी ट्रान्सवाल स्वतंत्र झाला असला तरी असाच कायदा पुन्हा करा, असा कानमंत्र ही दिला. १९०७ च्या सुरूवातीला ट्रान्सवाल स्वतंत्र होताच हाच कायदा नव्याने संमत करण्यात आला. ४ नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशाची स्वायतत्ता राखणे, या उदारमतवादी धोरणाचा भाग म्हणून ब्रिटीश शासनाने त्यास मंजुरी दिली होती. वांशिक समानता आणि साम्राज्याचे आपल्या हिंदी प्रजेसंबंधीचे कर्तव्य या लिबरल तत्वांकडे दुर्लक्ष करण्यात आले. ट्रान्सवालमध्ये बोथा आणि स्मट्स हे मूळ बोअर समुदायाचे नेते निवडून आले होते. त्यांच्या तर वंशभेदाविषयी आग्रह होता. सर्व प्रयत्न झाले आणि शेवटी सत्याग्रहाचे शस्त्र वापरण्यात आले.

प्रतिस्पर्ध्यावर विश्वास हे एक जगावेगळे तत्व आहे. जनरल स्मट्स यांनी अनेक वेळा विश्वासघात करूनही गांधींनी त्यांच्यावर विश्वास दाखविला नाही. आवश्यकता भासल्यास आपण कधीही पुन्हा सत्याग्रहाचे अस्त्र उपसू शकतो. यावर त्यांची श्रध्दा होती. सत्याग्रहाची धार ते अस्त्र पुन्हा वापरल्यामुळे बोथट होत नाही. हे गांधीनी आपल्या सहकाऱ्यांना दाखवून दिले होते. आत्मक्लेश हे सत्याग्रहीचे मुख्य अस्त्र असेल तर त्यासाठी सत्याग्रहींना तयार करणे आवश्यक होते. लढणाऱ्या सैन्याला जिंकविणे, युध्द कौशल्यात तयार करणे आवश्यक असते. तितकेच गांधीना काही वर्षापुर्वी फिनीक्स आश्रमाची स्थापना केली ती, जॉन रस्कीनच्या तत्वांनुसार. परंतु हळूहळू लिओ टॉलस्टॉय यांची विचारधारा आणि हेन्री डेव्हिड थोरो यांनी स्वत: आचरलेली तत्वे यांचाही स्विकार करण्यात आला. टॉलस्टॉय फार्मची

स्थापना झाली ती सत्याग्रहींच्या कुटुंबियांना आसरा मिळावा आणि त्याचवेळी त्यांची पुढील लढ्यासाठी तयारी करावी. यासाठीच तुरूंगात काफिर कैद्यांना जो मानहानीकारक युनिफॉर्म देत असत. तसेच कपडे वापरण्याची सवय देखील या आश्रमवासियांना लावली होती. सत्याग्रहाचे एक महत्वाचे तत्व असे होते की, या तत्वांची न्यायता लक्षात आणून देवूनच प्रतिस्पर्ध्याला गाठणे हे गांधींना मान्य नव्हते.

१९१३ मध्ये लॉग मार्च वेळी महात्मा गांधी आणि त्यांचे मुख्य सहकारी कॅलन ब्लॅक व प्रोक्राक यांना अटक झाली. तरीही सत्याग्रही शिस्तीने शांततामय राहिले. मोर्चेकऱ्यांनी जरासे हिंसक वळण घेतले असते तरी त्यांचा नायनाट करणे स्मट्सच्या माणसांना सोपे गेले असते. अखेरीस दक्षिण आफ्रिकेतील अत्याचार सहन न होवून हिंदुस्थानातील व्हॉईसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांनी आपला आवाज उठविला. जनरल स्मट्स यांनी सॉलोमन कमिशन नेमले. महात्मा गांधींनी सत्याग्रह मागे घेवून या कमिशनशी सहकार्य करावे, असे गोपाळ कृष्ण गोखले यांचे मत होते. परंतु जोवर आपल्या मूळ अटी मान्य होत नाहीत, तोवर गुरूची आज्ञा देखील मानणार नाही. अशी भूमिका घेवून महात्मा गांधींनी सत्याग्रह चालूच ठेवला. स्मट्स या चळवळीला कंटाळले होते. त्यांना युनियन ऑफ साऊथ आफ्रिका या नवीन देशाच्या प्रगतीत हा अडथळा नको होता. त्यांनी कमिशन कडून आपल्याला तात्पुरते हवे ते वदवून घेतले आणि १९१४ मध्ये इंडियन रिलीफ ॲक्ट संमत झाला. सत्याग्रहीच्या सर्व मागण्या मान्य झाल्या. आयतीच संधी आली आहे तर आपणही काही मागण्या मान्य करून घ्याव्यात अशी सहकाऱ्यांची सूचना होती. महात्मा गांधींनी त्या सुचनेला स्पष्ट विरोध केला. महात्मा गांधींचं व्यक्तीमत्व हे मूलत: आत्मशक्ती साधायच होत. साधन शब्दप्रयोग केला तरी आपल्याला केवळ जंगल व पद्मासन आठवते. किंवा धर्माचा आधार असलेली इतर कोणतीही बाब आपल्या ध्यानात येईल. हा आपल्या पूर्वग्रहांचा परिणाम आहे. ही साधना सामाजिक अन्यायाचा प्रतिकार करत, समाज समर्पित जीवन व्यतित करता येते व ती त्यांनी केली. आजही ही भीती भौतिक सुखसाधने न कमावता छोट्या समूहातील असे जीवन अनेकांना आवडेल. महात्मा गांधींना मात्र या आधुनिक जीवनशैलीतील सुखसोयींनाच विरोध होता. सर्व समाजाने वरील सोयीच्या बाबी स्विकारल्या तर त्याला ते समजेल हे महात्मा गांधींचे मत होते.

**निष्कर्ष**

आज समाजाचा भौतिक सुखाचा प्रवास दुसऱ्या टोकाला गेला आहे व त्याचे अत्यंत प्रसरण देखील होत आहे. सुमारे १०० वर्षापुर्वी महात्मा गांधींनी जी पश्चिमी संस्कृती, जीवनशैली ठामपणाने नाकारला ती संस्कृती त्याच दिशेने जात आहे. शंभर वर्षानंतरच्या काळानंतर देखील सुटलेले नाहीत असे प्रश्न आज परत एकदा निर्माण होत आहेत. त्यावर महात्मा गांधींची नीती हेच उत्तर आहे. मग तो काश्मीरचा प्रश्न असो, मध्यपुर्वेतील युध्दजन्य स्थिती असो, पूर्व युरोपातील गुंता असो, की श्रीलंकेतील वांशिकवाद असो. सहकार्य व परस्पर तारतम्य यांच्या आधारे प्रतिस्पर्ध्यां बरोबर न्याय निर्णयाकडे पोचणे हा एकच गांधीवादी मार्ग त्यावर दिसतो. परंतु सत्याग्रह या सर्वात ताकदवान अस्त्राचा उपयोग करण्यापुर्वी त्याची तात्विक बैठक आणि तंत्र समाजावून घेतले पाहिजे. अन्यथा आधुनिक काळातील सिंथेटी सत्याग्रही अशीच प्रतिमा निर्माण होईल. बुध्दाचा करूणामय, येशूचा क्षमाशील, पैगंबराचा परोपकारी व श्रीकृष्णाचा निष्काम कर्मयोगी समाज हजारो वर्ष झाली तरी अजून पुर्णपणे अस्तित्वात आलेला नाही. तो त्यांनी समाजाच्या विशीष्ट बाह्यरचनांचा आग्रह धरला नाही व त्या उभारल्या नाहीत म्हणून, त्याला अनुकूल मानवी समाज बनलेला नाही. मात्र तरी देखील हे महात्मे मानवाला मार्गदर्शक व प्रेरणादायी दीपस्तंभ आहेतच. भयग्रस्त नसलेला, सर्वार्थाने निर्मळ, साधे, सुंदर जीवन जगणारा असा आदर्श मानवी समाज कधी काळी अस्तित्वात येईल या आधारावरच महात्मा गांधी यांच्या विचारांची पुर्नमांडणी करणे आवश्यक आहे. अशा समाजाच्या निर्मितीसाठी महात्मा गांधींचे विचारच उपयुक्त आहेत हे समाजाला समजावण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची**

१. मानवी हक्क आणि महात्मा गांधी – लिआ लेव्हिन, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, १९६७

२. हिंद स्वराज्य, महात्मा गांधी, नवजीवन प्रकाशन अहमदाबाद, १९७८

३. सत्याचे प्रयोग, महात्मा गांधी, नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद, १९७९

४. गांधी जीवन रहस्य, आचार्य जावडेकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९५